# लैंगिक नवमतवाद—२

अांद्रे पॅरी यांचे फ्रेंच लेखावरून

धर्माच्या शृंखलांतून आपणांस मुक्त समजणाऱ्या लोकांत देखील बराच धार्मिक मूर्खपणा शिल्लक असतो उदाहरणार्थ फ्रान्समध्यें जरी धर्माला सरकारी दृष्टीने अस्तित्व नाही, तरी तेथील कायदे पाहिले तर ते अजून धार्मिकच आहेत. ख्रिस्ती धर्मांत लैंगिक ज्ञान अश्लील समजतात, यामुळेंच लैंगिक शिक्षणाकडे कायदाहि लक्ष देत नाही आणि पालकहि देत नाहीत. यामुळेच मुलांच्या डोक्यांत याविषयी भलभलत्या कल्पना शिरतात. विवाहबाह्य समागमाला धर्माची आड-काठी, पण धर्मापासून अलिप्त मानलेले कायदे देखील अनौरस मुलांना कमीपणा देतात, अविवाहित आयांचे हाल करतात आणि व्यभिचाराला गुन्हा समजतात. ही कायद्याची गोष्ट झाली. सामाजिक छळ तर कायद्याचेहि पलीकडे आहे आणि यामुळे इतर बाबतींत लोक कितीहि क्रांतिकारक मतांचे असले तरी लैंगिक बाबतींत मात्र त्यांना समाजाला भ्यावें लागतें कारण समाजाविरुद्ध जाण्याचें धैर्य फार थोड्या लोकांत असतें. माझ्या ओळखीच्या दोन क्रांतिकारकांपैकी एकाचा मुलगा व दुसऱ्याची मुलगी यांचें विशेष सख्य पाहून, लोकांना बोला-यला जागा राहूं नये म्हणून, त्यांनी त्यांचा वाङ्निश्चय करून टाकला. यानंतर एकदा सुटीच्या दिवसांत मुलीने मुलाच्या घरीं रहाण्यास जाण्याचा प्रश्न निघाला असतां, लोकांना विवाहपूर्व समागमाची शंका येऊं नये म्हणून, त्यांनी तो बेत रद्द केला ! आणि विवाहापासून कोणत्याहि प्रकारचा फायदा नसून तोटे मात्र भरपूर आहेत असें त्यांचें मत असूनहि ते मुलांचें कायदेशीर लग्न लावून देतील हें मला उघड दिसतें आहे.

घटस्फोट धर्माला पसंत नाहीं, म्हणून कायद्याने त्याला परवानगी असली तरी देखील तो सहज मिळत नाही. त्याला शक्य तितके अडथळे घातलेले

आहेत आणि खर्चहि फार येतो. धर्माला सहशिक्षण पसंत नाही, म्हणून तें स कारलाहि पसंत नाहीं आणि मुलांमुलींच्या शाळा वेगळ्या असतात. धर्मा संततिनियमन किंवा गर्भपात पसंत नाही, म्हणून संततिनियमनाचे मार्ग उघड सांगणें किंवा गर्भपात करणें हे गुन्हे आहेत. धर्मांत स्त्रियांचा दर्जा कमी आ म्हणूनच कायद्यांत देखील विवाहित स्त्री नवऱ्याच्या ताब्यांत दिलेली असते, राहील तेथें तिला राहिलें पाहिजे आणि तिच्या मालकीची इस्टेट असली तरी ति व्यवस्था कायद्याने नवऱ्याकडे दिलेली असते. एकंदरींत स्वातंत्र्यवादी क्रांतिका लोक सुद्धा या बाबतींत कांही करीत नाहीत किंवा करण्याची इच्छाहि दर्श नाहीत. या परिस्थितीचे परिणाम अत्यंत भयंकर आहेत. त्यापैकी कांही येथे पा

लैंगिक गरजांचे बाबतींत तरुणांचे नेहमी हाल होतात. विवाह लव करणें शक्य नसतें आणि त्यापूर्वी नैसर्गिक जीवन अशक्य असतें. त्यांनी एक ब्रह्मचर्य पाळून शारीरिक आणि मानसिक हानि सोसली पाहिजे, किंवा चोर मारून शक्य होईल तेव्हा आपली गरज भागवली पाहिजे. ती भागवण्याचे अ मार्ग त्यांना मोकळे असतात. यांत त्यांच्या प्रकृतीला अत्यंत धोका असतो कधी भयंकर रोगहि होण्याचा संभव असतो. प्रथमसमागम जर योग्य परिस्थि झाला नाही किंवा इतर कांही वाईट संवयी लागल्या तर याचा परिणाम त्यांच एकंदर आयुष्यावर होतो आणि या दिव्यांतून सहीसलामत सुटणारे लोक थो आणि एकंदर सर्व तरुणांना ज्या नैसर्गिक जीवनाचा फायदा मिळाला पाहिजे तर कोणालाच मिळत नाही, आणि यामुळे व्यक्तिविकासाला मुळीच जा मिळत नाही.

यानंतर विवाह होतो. वैवाहिक जीवन यशस्वी होण्याला कोणत्या गो आवश्यक आहेत याचा त्यांना बिलकुल दाद नसते. स्वतःची व पतीची कि पत्नीची प्रकृति यांचा मेळ बसेल की नाही, शरीराला अपाय झाल्याशिव संततिनियमन कसें करावें, फार काय, समागम तरी सुखकर कसा होईल, या त्यांना बिलकुल माहिती नसते. या सर्वांचा परिणाम म्हणजे पतीने किंवा पत्न

घर सोडून जाणें, मुलें रस्त्यांत टाकून देणें किंवा मारणें, गुप्त गर्भपात आणि त्यापासून दरवर्षी हजारों स्त्रियांची प्राणहानि, वगैरे.

या भयंकर स्थितीला एकच उपाय आहे. तो म्हणजे ज्यांचा धर्मावर विश्वास नसेल त्यांनी यासंबंधी तर्कशुद्ध विचार करून त्याप्रमाणे वागणें. तर्कशुद्ध विचार करूं गेल्यास आपल्याला प्रथम जी गोष्ट दिसते ती ही की जगांतील दुःख कमी करणें आणि सुख वाढविणें, हेंच आपल्या कोणत्याहि उद्योगाचे अंतिम ध्येय असलें पाहिजे. स्वर्गांतील काल्पनिक सुखावर भिस्त ठेवून स्वतःचे शक्य तितके हाल करून घेणें हा धार्मिक बावळटपणा आहे. समंजस मनुष्याला सुखाच्या शोधांत फक्त एकच गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे की आपल्या सुखामुळे दुसऱ्या कोणाला त्रास होतां नये. इतर कशाचाहि विचार करण्याचें कारण नाही.

अनुभवानें असें दिसतें कीं कामवासनेचें समाधान केल्यापासून निरतिशय आनंदाचा लाभ होतो. त्यापासून नुकसान तर होत नाहीच पण आरोग्याला त्याची जरूर असते आणि ब्रह्मचर्यापासून अनेक प्रकारचें नुकसान होतें. लैंगिक गरजांचें समाधान झाल्यापासून जो शारीरिक व मानसिक फायदा होतो, त्याने व्यक्तिविकासाला मदत होते; कारण मनुष्याच्या सर्व गरजांचें योग्य समाधान होण्याने जीवनाला अधिक पूर्णत्व येतें. अर्थात् ज्यांची प्रकृति ठीक नसेल त्यांचें समागमाने नुकसानहि होईल, परंतु आजारी मनुष्याला मोकळी हवा कदाचित् बाधेल म्हणून कोणींच मोकळ्या हवेंत जाऊं नये म्हणणें समंजस होईल काय? अन्नाच्या अतिरेकाप्रमाणेच समागमाच्या अतिरेकानेहि मनुष्य मरेल, परंतु अन्न मुळीच खाऊं नये म्हणणें जसें समंजस नाही, त्याचप्रमाणे ब्रह्मचर्याचा उपदेशही समंजस नाही. वस्तुतः नुकसान होणें तर बाजूलाच, पण समागम नियमित रीतीने आणि वारंवार केल्यास एकंदर शरीराचा उत्साह वाढतो. प्रत्येक व्यक्तीचे बाबतींत कोणत्याहि वयांत समागमाची योग्य मर्यादा अनुभवावरून ठरवतां येईल. आपल्या गरजा न ओळखल्याने किंवा दडपून टाकल्याने आरोग्य मिळत नसतें, त्या गरजांचें योग्य समाधान केल्यानेच आरोग्य मिळतें.

तेव्हा संभोगसुख रास्त आणि इष्ट आहे हें सिद्ध झालें. त्यांत हेंहि लक्षांत घेत पाहिजे की पुष्कळांस योग्य प्रकारचें आणि दर्जाचें समागमसुख न मिळाल्यामुळे ते अतिरेकाला प्रवृत्त होतात. ज्यांचें योग्य समाधान होतें ते अतिरेक कर नाहीत असाच सामान्य अनुभव आहे.

कामवासनेचें पूर्ण समाधान होण्याचे मार्गांत दोनच अडचणी आहे त्या म्हणजे अवांच्छित संतति आणि रोगांच्या संसर्गाचें भय. परंतु रशिया अनुभवावरून असें दिसतें की संततिनियमन, आणि तेवढ्याने न भागल्या शास्त्रीय रीतीने गर्भपात करतां आल्यास पहिली अडचण नाहींशी होते, व दया परमेश्वराने उत्पन्न केलेल्या संसर्गजन्य रोगांचा देखील प्रतिबंध करतां येते याकरता कांही रासायनिक मार्गहि आहेत आणि समागम कोणाशीं करावा या बंधी काळजी घेतल्यास रोग होण्याचा संभव रहात नाही. म्हणजे पुरुषां वेश्यांकडे जाण्यापेक्षा मुदतीचा विवाह केल्यास बरें. या अडचणी नाहींशा झाल म्हणजे इतकाच प्रश्न राहिला की समाजानें सवांवर लादलेले कायदे न मोडत पुढारलेल्या लोकांना कामवासनेचें समाधान करण्याचा सर्वांत समंज मार्ग कोणता ?

लहान मुलांना कामवासना नसते, तरीहि त्यांना भिन्नलिंगी मुलांसंबं आकर्षण वाटतें आणि मुलें कशीं होतात याबद्दल जिज्ञासा असते. तेव्हा त्यांच प्रश्नांचीं खरीं उत्तरें देणें आणि मुलांमुलींना एकमेकांशीं खेळूं देणें हें पालकां कर्तव्य आहे. वयांत येण्याचे सुमाराला मुलांमुलींची मनःस्थिति फार चमत्कारि होते आणि त्यांना तात्पुरत्या कांही संवयी लागतात. तिकडे दुर्लक्षहि करत नये आणि त्यांना विनाकारण रागेंहि भरतां नये. त्यांना यासंबंधी जरूर तें ज्ञा द्यावें आणि काय केलें असतां प्रकृति चांगली राहील हें सांगावें. स्वसंभोगाच्य संवयीपासून फारसें नुकसान होत नाही, तेव्हा त्यांना मनोनिग्रहाचा उपदे करावा, पण घाबरवूं नये. फ्रान्सच्या हवेंतील मुलगी १५ वर्षांची आणि मुल १९ वर्षांचा झाल्यावर त्यांना समागमाची जरूर भासते. या वेळीं पालकांनी

हें ठरवणें जरूर आहे की त्यांना ब्रह्मचर्याचा उपदेश करून त्यांनी तो शक्य तितक्या वेळां मोडावा हें बरें, की नैसर्गिक समागमाची कांही तजवीज केलेली बरी? अर्थात् प्रकृति बरी नसल्यामुळे समागमापासून नुकसान होईल असें डाक्तराने सांगितल्यास गोष्ट वेगळी.

त्यांत असाहि प्रश्न येतो की मुलीचे बाबतींत समागमाची व्यवस्था झाल्यास तिला या वयांत संतति होणें इष्ट आहे काय? या वयांत योग्य पति किंवा पत्नी कोण होऊं शकेल हें त्याना समजणार नाही. अशा वेळीं त्यांना कायदेशीर लग्नाच्या बंधनांत जन्माचें अडकवणें योग्य होईल काय? अशा वेळीं समागम तर करतां यावा परंतु संतति तर होऊं नये. अशीच कांही तरी सोय करणें योग्य होईल. अशा रीतीने एकमेकांचा सर्व प्रकारचा पूर्ण अनुभव आल्या-नंतरच विवाहाचा विचार करणें योग्य होईल. आपण एकमेकांना सर्व प्रकारें योग्य आहों असा अनुभव आल्यावरच विवाह करणें हीच समाजाच्या प्रगतीची महत्वाची पायरी आहे, परंतु हल्लीच्या समाजांत काय करावें? हल्लीचे कायदे बदलून घेण्याचा प्रयत्न करावा हें ठीक आहे, परंतु तेवढ्यानेच पुढारलेल्या पाल-कांनी आपलें कर्तव्य केलें असें होत नाही. स्वतःपुरतें आणि आपल्या मुलांपुरतें त्यांनी यापुढे गेलें पाहिजे. संततिनियमनाचे मार्ग आता माहीत आहेत आणि रोगांचाहि प्रतिबंध करतां येतो, तंव्हां तरुणांची मुख्य अडचण पैशाची राहिली. त्यांना वेगळें बिऱ्हाड करणें शक्य नसतें आणि पालकांना अशी व्यवस्था करणें शक्य नसेल तर सहवासोत्तर विवाहाच्या दृष्टीने मुलाच्या मैत्रिणीला किंवा मुलीच्या मित्राला घरीं येण्याची किंवा रहाण्याची देखील पूर्ण मोकळीक देतां येईल, किंवा याशिवाय सुटीचे दिवसांत त्यांना सायकलवर किंवा इतर रीतींनी एकत्र प्रवास करण्यास मोकळीक द्यावी.

दुसरें असे कीं कायदेशीर विवाह करण्यांत कोणाचा काय फायदा होतो? विवाह करण्याने आपणावर काय काय जबाबदारी येते हें जर वधूवरांना कोणी स्पष्ट करून सांगेल तर फारच थोडे लोक विवाहाला तयार होतील. दोघांचें पटलें

तर ठीक, पण न पटल्यास हें बंधन तोडणें अत्यंत कठिण असतें आणि तें श
झालेंच तर तोडतांना अंगाचें साल जाण्याची वेळ येते. माझ्या एका मित्रा
विवाहानंतर पत्नीची व तिच्या आईची गर्हणीय सलगी दिसून आल्यामुळे त्या
घटस्फोट घेण्याचा निश्चय केला, परंतु त्याला हें कारण कोर्टांत सांगणें किंवा सि
करणें शक्य नव्हतें. कांहीहि करून हें लग्न मोडायचेंच असा त्याचा निश्चय अ
त्यामुळे त्याला पुढील अटी कबूल कराव्या लागल्या. मुलाच्या खर्चाकरता म्हण
महिना ४०० फ्रँक् ( म्हणजे त्याच्या पगाराचा चतुर्थांश ) द्यायचे आणि त्या
महिन्यांतून एक दिवस भेटण्याकरता ४० मैलांवरून स्वतःच्या खर्चानें आण
यचा आणि परत पोंचवायचा. इतकी भानगड करण्यापेक्षा विवाह करावया
कशाला ? तसाच संबंध ठेवावा.

जेथे प्रीतिविवाह असेल तेथेहि प्रेम नेहमी टिकत नाही इतकेंच नव्हे त
एकत्र रहाण्याचा अनुभव आल्याशिवाय वधूवर एकमेकांना अनुरूप आहेत कि
नाहीत हें कळणें शक्य नसतें. स्वभाव जुळले पाहिजेत इतकेंच नव्हे तर शरीरा
कांही भाग देखील जुळणें अवश्य असतें. एखाद्यांत असा एखादा दोष असेल
तो लवकर समजणार नाही, पण त्यामुळें दोघांचे पटणें अशक्य होतें, किंवा एख
वेळी एखाद्या क्षुल्लक दिसणाऱ्या गोष्टीवरून देखील दोघांनी सलोख्याने रहा
अशक्य होईल. एक बाई बाळंतपणांत अतोनात काफी पिऊं लागली आ
कोणी कितीही सांगितलें तरी ती ऐकेना आणि परिणामीं तिची प्रकृति बिघड
इतकेच नव्हे तर ती अत्यंत भांडकुदळ झाली ही गोष्ट अगोदर कळणें शक्
नव्हतें. तेव्हा न मोडता येण्यासारख्या कायदेशीर विवाहाचा करार करण्यापेक्ष
दोघांच्या संमतीनें मोडतां येण्यासारखा साधाच करार करावा आणि त्यांत सुच
तील तितक्या बारीकसारीक गोष्टी देखील नमूद कराव्या.

अर्थात् विवाहाशिवाय लोक उघड संबंध ठेवीत नाहीत याचें मुख्य कार
म्हणजे समाजाची भीति. लोक काय म्हणतील ? परंतु सामान्यतः असें आढळ
कीं जो दडपून वाटेल तें करणारा असतो, त्याला समाज फारसा त्रास देत नाही

पुढारलेल्या लोकांनी अशा रीतीने वागण्याचा आणि जरूर पडल्यास उघडपणीं आपली बाजू लोकांपुढे मांडण्याचा निश्चय केल्यास आणि त्यांची वागणूक इतर दृष्टींनी निर्दोष असल्यास लोक त्यांना एवढ्यावरूनच तुच्छ लेखणार नाहींत, अशा तऱ्हेचे विचार उघडपणें मांडण्यांत आमच्यावर जबाबदारी येते व ती आम्हीं ओळखून आहों. परंतु हल्लीची स्थिति तशीच राहूं देणें योग्य आहे काय? आमचे विचार अंमलांत आणण्याचें धाडस फारच थोड्या आईबापांस होईल हें उघडच आहे, पण हे विचार पुढारलेल्या मासिकांत नव्हे तर दुसऱ्या कोठे मांडायचे?

या विचारांविरुद्ध एक आक्षेप येणें शक्य आहे आणि त्याला उत्तर देणें भाग आहे. कित्येकांना असें वाटतें की राजकीय स्वातंत्र्य, भांडवलशाही, समाजसत्तावाद, युद्धाची भीति, फॅसिस्ट् व नात्सी पक्षांच्या हालचाली, वगैरे सर्व महत्त्वाचे विषय बाजूला ठेवून लैंगिक स्वातंत्र्यावर भर देणें योग्य आहे काय? या आक्षेपाला आमचें इतकेंच उत्तर आहे की इतर कोणत्याहि गोष्टीपेक्षा जगण्याचें महत्त्व जास्त आहे, कारण जगल्यासच कोणालाहि कांही कार्य करतां येईल; आणि लैंगिक प्रश्न हा दररोजच्या आयुष्यांत अत्यंत महत्त्वाचा आहे. तिकडे मुद्दाम डोळेझांक करून मजूरवर्गाला फक्त भांडवलशाहीविरुद्ध चिथावणें म्हणजे त्यांची फसवणूक करणें आहे. हा लोकहिताचा प्रश्न आहे आणि या बाबतींत शक्य तितकें दुःख कमी करणें आपलें काम आहे, व या प्रश्नाकडे दुर्लक्ष करण्यांत नुकसान आहे. चळवळीचा उपयोग आहे हें निर्विवाद आहे, परंतु म्हणून शिक्षणाचा उपयोग नाही असें होत नाही. म्हणून चळवळीबरोबरच शिक्षण झालें पाहिजे, तरच चळवळीचा पाया भक्कम होईल. शिक्षण द्यावयाचें म्हणजे तें पुरें दिलें पाहिजे, म्हणजे त्यांतून लैंगिक शिक्षण वगळतां नये. कांही लोकांना कामवासनेपासून निवृत्त करून केवळ चळवळीकडे लावतां येईल, परंतु सामान्य लोकांना संपूर्ण जीवनाने नवशक्ति आल्याशिवाय चळवळीला जोर येणार नाही, आणि धार्मिक खुळाचें निर्मूलन करून धर्मगुंडांची तंगडी मोडल्याशिवाय कोणतीहि प्रगति जोराने होणार नाही. कामवासनेच्या योग्य समाधानाने विल-

क्षण उत्साह येतो हा सामान्य अनुभव आहे आणि या बाबतींतील नैसर्गि जीवनाने तो उत्साह कायम टिकवतां येतो. तेव्हा मजूरवर्गाचें शिक्षण करण रांनी हें ध्येय पुढे ठेवलें पाहिजे. शारीरिक व मानसिक आरोग्य हा प्रगती पाया आहे. विवाहाने एकमेकांवर हक्क उत्पन्न होतो या कल्पनेने पतिपत्नी प्रेम निर्जीव होतें, परंतु विवाहाशिवाय स्त्रीपुरुष एकत्र राहिल्यास त्यांना ए मेकांचें प्रेम कायम राखण्याची खटपट करावी लागेल, कारण एरवी तीं एक रहाण्यास बांधलेलीं नाहीत. वधूवरें पुष्कळ वेळां अनुरूप नसतात आणि म्हण नच त्यांना विवाहाने एकत्र बांधावें लागतें, परंतु तीं अनुरूप असावीं अशी आमची इच्छा आहे आणि म्हणूनच आम्हाला विवाह नको आहे. अनुरू व्यक्तीच्या प्रेमाने मनुष्याची शक्ति दसपट वाढते. प्रेम हाच खरा देव आहे बाकीचे देव फुकट आहेत. परंतु तें प्रेम खरें पाहिजे, म्हणजे तें कर्तव्य होत नये. हृदयांतून निघालें पाहिजे. हल्लीच्या विवाहांत प्रेमाची चेष्टा होते, कर्तव्य होतें. खऱ्या प्रेमाची शक्ति अद्वितीय आहे. तें सर्वांस मिळेल अशी खटपट करणें हें खऱ्या पुढाऱ्यांचें काम आहे. ( ' इदे लीब्र, ' पॅरिस् )

---

# कायद्याचा चमत्कार

—:०:—

( फ्रेंचवरून )

पॅरिसमधील प्रसिद्ध वकील ओब्री यांना त्या दिवशीं कोर्टांत काम नसल्या मुळे ते आफिसांत स्वस्थपणें कांही खाजगी पत्रें लिहिण्याच्या विचारांत होते, तों कोणीतरी घंटा वाजवली आणि त्यांचा नोकर एक कार्ड घेऊन आंत आला. त्यांनी त्यावरील नांव वाचून त्या मनुष्याला आंत घेऊन यायला सांगितलें. नोकराच्या मागोमाग जो मनुष्य आंत आला, त्याचें वय सुमारें ४० वर्षांचे असावें. दोनचारच केस काळजी पूर्वक वळवून आणून डोक्यावरचें टक्कल झांक-



289543

ण्याचा प्रयत्न केला होता. त्याचा दर्जा विशेष उच्च नसावा आणि तो लोभी असावा असें स्पष्ट दिसत होतें आणि एकंदरींत त्याला पाहून कोणाच्याहि मनांत आपुलकी उत्पन्न होणें शक्य नव्हतें.

ओब्रींनी त्याला नेहमीच्या रिवाजाप्रमाणे बसायला सांगून काय काम आहे म्हणून विचारलें. तो म्हणाला ' माझ्या दोन मुलांच्या संबंधानें मी कांहीं अडच-णींत आहे.' तेव्हा ओब्रींनी पेन्सिल हातांत घेऊन विचारलें ' त्यांचीं नांवें काय ?' 'नांवें' ? ' हो, म्हणजे बोलतांना घोटाळा व्हायला नको ' ' नांवें म्हणतां होय ? काय. बरें त्यांची नांवें ? थांबा हां, आठवण करतों !'

ओब्रींनी पुष्कळ चमत्कारिक गोष्टी पाहिल्या होत्या, पण मुलांचीं नांवें न आठवणारा बाप कांहीं त्यांना अजून भेटला नव्हता. 'मी नोटबुकांतच पाहातों म्हणजे झालें' असें म्हणून त्याने खिशांतून नोटबुक काढून त्यांतून सुमारें चाळीस नांवें उलटींसुलटीं वाचून पाहिलीं. ओब्रींना वाटलें की या मनुष्याला ४० मुलें आहेत की काय !

--हां सांपडलें. एकाचें नांव आंरी गॅस्तॉं.

वकिलाच्या चेहऱ्यावरून त्याला फारच आश्चर्य वाटलें असें पाहून तो म्हणतो, ' आपल्याला थोडें आश्चर्य वाटल्यासारखें दिसतें.'

--थोडें नव्हे, अत्यंत आश्चर्य वाटलें आहे. तुम्ही माझी चेष्टा तरी करतां आहांत किंवा मला कांहीं कळत तरी नाहीं.

—त्यांत विशेष कांहीं नाहीं. मला ४५ मुलें आहेत, इतकेंच.

—४५ मुलें ? आणि तुमचें वय काय आहे ?

—४५ वर्षें.

--माझी मति तर गुंग झाली. तुम्हीच समजावून सांगाल का ?

—त्यांत कठिण कांहींच नाहीं. अशीं मुलें कोणालाहि असूं शकतील.

—हें पहा, मला असावीं अशी कांहीं इच्छा नाहीं.

—यापेक्षा जास्त सुद्धा असूं शकतील.

—पण माझी खात्री कशी व्हावी? ४५ वयाला ४५ मुलें! कोणाला झाली होती कधी? आणि मग हीं किती बायकांची मुलें आहेत? कारण एकीला इतकीं होतीलसें दिसत नाही.

—बायका साधारण चाळीस एक.

—म्हणजे तुम्हीं चाळीस वेळां लग्न केलें, का तुमच्या जनानखान्यांत ४० बायका आहेत?

—छे, छे! माझें लग्न एकदाच झालें आणि खरें म्हटलें तर मला औरस मूल एकच आहे. बाकीचीं आपलीं अशींच.

—हां, हां. आतां मी समजलों.

येथे वाचकांचा थोडा गैरसमज होण्याचा संभव आहे, परंतु तो लवकरच दूर होणार असल्यामुळे जास्त लिहिण्याचें कारण नाही. एका ४५ मुलांच्या बापाची हकीकत एका मासिकांत वाचलेली असल्यामुळे ओर्ब्रींना तोच हा मनुष्य असावा असें समजलें. तथापि त्यांची जिज्ञासा पूर्ण करण्याकरता त्याने पुढील हकीकत सांगितली. "१८ व्या वर्षी माझी आई मेली व आणखी ४ वर्षांनी बाप मेला. आणि त्याचें वार्षिक उत्पन्न त्याच्याच बरोबर संपल्यामुळे मी एकदम कफल्लक झालों. त्याच प्रेतयात्रेंत एक वकील होता, तो मला म्हणाला, 'असें विचारूं नये पण विचारतों. तुमच्याजवळ बिलकुल पैसे नाहीत, हें खरें ना?'

—अगदीं खरें.

—आणि फारसें काम केल्याशिवाय तुम्हाला पैसे मिळाले तर पाहिजे आहेत, खरें की नाही?

—खरें. पण हें सगळें कशाकरता बोलत आहांत तुम्ही?

— तसे पैसे मिळवायची युक्ति सुचवायची आहे म्हणून.

—ती काय?

—माझ्या एका अशिलाचें अनौरस मूल आपलें म्हणण्याची जर तुमची तयारी असेल तर तें मूल वयांत येईपर्यंत तुम्हाला दरवर्षी १५०० फ्रँक मिळतील.

इतकेंच नव्हे तर त्याबद्दल तुम्हाला बिलकुल खर्च करावा लागणार नाही, त्रास होणार नाही, फार काय तुम्हाला तें मूल दिसणार सुद्धा नाही.

—पण कायद्याची कांही भानगड ?

—त्याची बिलकुल भीति नाही. बाळंतपण झाल्याबरोबर दोन साक्षीदार तुम्हाला बोलवायला येतील. त्यांचेबरोबर नोंदणीआफिसांत जाऊन सांगायचें की मला मुलगा झाला आहे ( किंवा मुलगी झाली आहे ).

—आणि आई कोण सांगायची ?

—आई अज्ञात म्हणून सांगायचें !

मी हें कबूल केलें आणि मी आतां आंरी गॅस्ताँ म्हणून जें नांव सांगितलें तें त्याच मुलाचें.''

--मग तो आता वयांत आला असेल ?

--होय हो, तो वयांत येऊन ३ वर्षें झालीं आणि माझें वर्षासनहि बंद झालें. आता मला त्याच्याशीं काय करायचें आहे ?

--बरें मग ?

--मी जेव्हा पाहिलें कीं पैसे मिळवायचा हा बरा मार्ग आहे, तेव्हा मला वाटलें असेच आणखी पैसे कां नाहीं मिळवूं ? आणि मी त्या वकिलाला तसें जाऊन विचारलें. तो खूप हंसला आणि हा नवा धंदा शोधून काढल्याबद्दल त्याने माझी तारीफ केली. तो म्हणाला अशीं पाहिजे तितकीं मुलें तुम्हाला मिळतील, चैन आहे तुमची ! आणि खरोखरच त्याने मरेपर्यंत आणखी १२ वर्षांत मला आणखी १० मुलें दिलीं ! त्यांपैकीं एकाचे मला ३००० फ्रँक वर्षाचे मिळत असत, पण तो लवकर मरूनच गेला. तो मेल्याबद्दल मला फार वाईट वाटलें. त्याचा फोटो माझ्या घड्याळाच्या सांखळीला आहे.

--मग तुम्ही बरेच श्रीमंत झालां असाल ?

—तो वकील मेला तेव्हा माझें वार्षिक उत्पन्न १५–१६ हजार होतें. हल्ली तीस हजार आहे.

--आणि त्रास नाही!

--कधी कधी कांही सह्या वगैरे याव्या लागतात आणि थोडी जबाबदारीहि असते. उदाहरणार्थ एक श्रीमंत कुटुंब कांही कामाकरता एक महिना पॅरिसला जाऊन राहिलें. मुलगी तरुण होती, तिला तेथें एक प्रेमी भेटला आणि गर्भ राहिला, आणि ते गांवीं परत गेल्यावर ९ महिन्यांनी मूल! आईबापांना काय करावें तें कळेना, पण तें प्रकरण गुप्त राहिलें आणि मूल मी आपलें म्हणून सांगितलें. यानंतर ५ वर्षांनीं म्हणजे ती मुलगी २३ वर्षांची झाल्यावर तिने आपल्या एका बालपणच्या मित्राशीं लग्न केलें. त्याला पूर्वीची हकीकत माहीत असल्यामुळे लग्नाच्या वेळीं तें मूल त्याने आपलें म्हणून सांगून औरस करून घेतलें.

--म्हणजे मुलाला दोन बाप झाले म्हणायचे!

--मग काय तर! या तुमच्या कायद्याप्रमाणे दहा माणसांनी जर सह्या करून दिल्या तर मुलाला दहा बाप देखील होतील!

--तें खरें, पण पुष्कळ वेळां असेंहि होतें कीं खरा बाप कोण हें समजणें कठिणच असतें!

--ती एका नटीची गोष्ट आहे ना? ती एकदा गर्भार राहिली, तेव्हा सहज म्हणाली 'हा कोण गद्धा आहे हें मला माहीत असतें तर अशी काढली असती त्याची!'

--बरें पण तुमची हकीकत तर पुरी करा.

--त्या मुलाला दुसरा बाप मिळाल्याची बातमी मला वकिलाने दिली आणि कळवलें कीं त्याचे पैसे आता मिळणार नाहीत. पण मी तसा थोडाच ऐकणार? मी त्या लोकांना दोन गोष्टी सांगून पाहिल्या आणि ते जेव्हा ऐकेनात तेव्हा मग कोर्टाकडे अर्ज केला की मुलाचा हा दुसरा बाप खोटा ठरवावा. मग काय विचारतां? माझा अर्ज कोर्टापुढे आला तेव्हा मला पहायला लोकांची ही गर्दी! कारण मीच प्रथम मुलाचा बाप म्हणून सांगितल्यामुळे मलाच लोक त्या मुलीचा प्रेमी समजत होते! माझ्या वकिलाने सांगितलें कीं तिचा नवरा तिचे-पेक्षा तीन वर्षांनी लहान असल्यामुळे गर्भधारणेचे वेळीं तो १५ च वर्षांचा होता,

तेव्हा तो खरा बाप नसण्याचा संभव नाही. शिवाय तो तिच्यापासून बराच लांब रहात होता. परंतु कोर्टाने असा निकाल दिला की १५ च काय पण १४ वर्षांचा मुलगा देखील बाप होऊं शकतो आणि तो लांब रहात असला तरी त्यांची भेट होणें शक्य होतें. या खटल्यामुळे सगळा घोटाळा झाला.

—तो कसा काय ?

—त्याच्यामुळे मला बरेच दिवस बाहेरगांवी रहावें लागलें आणि इकडे माझी बायको पॅरिसला एकटीच राहून मन मानेल तशी मजा मारीत असल्याची मला बातमी लागली.

—तें असो, पण तुमच्या ४५ मुलांविषयीं आणखी कांही गंमती सांगा कीं !

—तशा सांगायलाच लागलों तर पुष्कळ आहेत. माझा वकील होता थोडासा थट्टेखोर. त्याच्या ओळखीच्या एका कुटुंबांत तीन माणसें होतीं, नवरा, बायको आणि नवऱ्याची बहिण. आणि त्या तिघांचींही प्रेमपात्रें घराबाहेर होतीं. तिघांनाही अनौरस मुलें झालीं आणि तिन्ही मुलांचा मी बाप झालों ! या कुटुंबांतल्या मुलापासून त्याच्या आईच्या नोकरिणीला एक मुल झालें. त्याचाही बाप मीच ! अर्थात् हा भाडोत्री बाप कोण आहे तें त्यांना मुळीच माहीत नव्हतें.

— बरें पण तुम्ही माझ्याकडे कां आलांत ते सांगावयाचें राहिलेंच.

—अरे हो, तें सांगावयाचेंच राहिलें ! माझ्या खोट्या मुलांची हकीकत तुम्हांला सांगितली, पण मला एक खरा मुलगा देखील आहे. त्याच्यावर माझा हक आहे की नाही हें ठरवायला मी तुमच्याकडे आलों आहे.

—म्हणजे, ही काय भानगड आहे ?

—सांगतों ऐका. चार वर्षांपूर्वी एक तरुण स्त्री आपल्या नवऱ्याला सोडून माझ्याजवळ येऊन राहिली आणि आम्ही उघडपणें नवरा बायकोसारखीं रहात होतों. त्यानंतर ११-१२ महिन्यांनी तिला मुलगा झाला, त्याची नोंद माझ्या नांवाने करून आई अज्ञात म्हणून सांगितलें. यानंतर लवकरच तिचा नवरा मेला आणि मी तिच्याशी लग्न केलें. तीन वर्षेपर्यंत आमचें ठीक चाललें होतें, पण नंतर ती

मला सोडून दुसऱ्याजवळ जाऊन राहिली. मीं घटस्फोटाकरतां अर्ज केला, तो आता लवकरच कोर्टापुढे येईल. पण आता माझी बायको मुलावर हक्क सांगते, तेव्हा आता काय करावें ?

ओत्री विचारांत पडले. कायद्यानें पाहिलें तर मुलावर हक्क आईचाच होता, कारण नवऱ्यानें जर मूल आपलें नाहीं असें ठरवून घेतलें नाहीं तर विवाहित स्त्रीला झालेलें मूल नवऱ्याचेंच धरलें जातें. तें मूल दुसऱ्याच्या नावानें नादलें गेलें हें खरें, परंतु कायद्याच्या दृष्टीनें औरस मुलांसंबंधीं अशी नोंद करतां येत नाहीं. तें मूल त्याचें स्वतःचें होतें हेंही पुरेसें कारण नाहीं. कारण व्यभिचारापासून झालेल्या मुलांचीही तशी नोंद करतां येत नाहीं. तथापि ओत्रींनीं शेवटीं आपलें मत असें दिलें की मुलाची आई कोण हें ठरवूं लागल्यास मूल व्यभिचारापासून झालें असेंच ठरेल आणि यांत मुलाचें नुकसान असल्यामुळे कोर्ट अशा प्रकारची फिर्यादच घेणार नाहीं.

शेवटीं आईनें फिर्याद करण्याची धमकी अंमलांत आणली नाहीं, त्यामुळे हा प्रश्न कोर्टापुढे आलाच नाहीं.

---

# पोंच व अभिप्राय

——: *०* :——

१. **वैधव्यालाप**, रचनाकार, वि. ह. बेलसरे, ' स्फूर्तिगीतें ' कर्ते, प्रेसिडेन्ट्, आर्यमिशन, तळेगांव-ठाकूर, ( अमरावती ). किंमत २ आणे.

ख्रिस्ती समाजांत जन्मलेले शेंकडा ९९ लोक ख्रिस्ती असतात, मुसलमान समाजांत जन्मलेले मुसलमान असतात. सारांश मनुष्याचा धर्म किंवा ईश्वरविषयक कल्पना या त्याच्या स्वतःच्या नसून त्या आईबापांनीं किंवा आसपासच्या इतर माणसांनीं असमंजस वयांत मनुष्यावर लादलेल्या असतात आणि त्या कल्पना आपण स्वतः विचार करून बनवल्या अशी आपली स्वतःची फसवणूक शेंकडा

९९ लोक करून घेत असतात. आणि यामुळेच प्रत्येक धार्मिक मनुष्य स्वधर्माची स्तुति आणि इतरांची निंदा करीत असतो. त्यांतल्या त्यांत ज्यांना थोडा बहुत विचार करतां येतो ते इतरांची निंदा न करतां स्वधर्म चांगला म्हणतात. त्याच्या पुढच्या पायरीवरील लोकांत धर्माचें इतर कांही शिल्लक न राहिलें तरी ईश्वरावरचा विश्वास मात्र शिल्लक राहतो आणि तो कांही केल्या जात नाही. अर्थात् या विश्वासांत विचाराचा अंश मुळीच नसतो, केवळ लहानपणीं मनांत भरलेल्या कल्पना मोहोरबंद कप्प्यांत ठेवलेल्या असल्यामुळे विचाराचा स्रोत तेथपर्यंत पोचूं शकत नाही. कांही रोगजंतु जसे शरीरांत खोल दडून रहातात आणि औषध त्यांच्यापर्यंत पोंचणेंच जवळ जवळ अशक्य असतें, तशीच या अंधश्रद्धेची गोष्ट आहे. या आंधळ्यांच्या माळेंत वरील ग्रंथकाराने स्वतःला गोवून घेतलें आहे, कारण ते प्रस्तावनेंत म्हणतात, 'प्रस्तुत विचार अगदींच नवीन आहेत अशांतला मुळींच प्रश्न नाही. ते आर्यसंस्कृतीला चांगलेच चिरपरिचित असून थोरामोठ्यांनी पुनः पुनः सांगितलेले आहेत आणि त्याप्रमाणे मींहि ते **गतानुगतिक या न्यायाने** फिरून सांगण्याचा प्रयत्न करीत आहें.' हे गतानुगतिक लोक विचार करीतच नसल्यामुळे ते जेव्हा सुसंगत विचाराचें ढोंग करतात तेव्हा अत्यंत हास्यास्पद होतात. उदाहरणार्थ ईश्वर निर्गुण, निराकार असून शिवाय दयाळू, सर्वशक्तिमान वगैरेहि असतोच ! हे गृहस्थ प्रस्तावनेंत म्हणतात, ' कुणी ईश्वर नाही म्हणतो तर कुणी हें जग स्वाभाविकच झालें असें म्हणतो. पण ह्या गोष्टी निव्वळ आपल्या आटोक्याबाहेरच्या असतांही त्यावर एकदम सिद्धांत ठोकण्यासारख्या आहेत. जगांत ईश्वर आहे हें कुणालाहि कबूल केलें पाहिजे. ' अशा लेखकाकडून सुसंबद्ध वाक्यांची अपेक्षा करणेंच चूक आहे, आणि अशा लिखाणावर टीका करण्यांतही फायदा नाही: ' ईश्वर आपणावर आपत्ति आणतो ती नुकसान करण्याकरितां नव्हे तर केवळ आपली जाणीव करून देण्याकरतां. ' क्वेटाचा धरणीकंप बहुधा याकरताच केला असावा. इतरांना जाणीव व्हावी म्हणून क्वेटांतील हजारों लोक मारून टाकले ! ' यावरून ईश्वराचें आपण नित्य स्मरण करीत जावें हें सिद्ध होतें. ' पण तरीसुद्धा इत-

रांना जाणीव करून देण्याकरता आपल्याला ईश्वर कधी मारील याचा नियम नाही, कारण केटांत ईश्वराचें स्मरण करणारा कोणीच नव्हता असें थोडेंच आहे ? पण तेहि मेलेच ! आपण ईश्वराचें स्मरण केल्याने ईश्वराचा काय फायदा होतो हें समजणें कठिण आहे. दररोज सकाळीं लवून कुर्निसात न करणाराचें डोकें फोडणारा एखादा अधिकारी असला तर त्याला आपण काय म्हणूं? हा केवळ अहंकार आहे. ईश्वराला अहंकार असतो काय ? ईश्वराला स्वतःचें नांव किंवा स्तुति ऐकण्याची आवड असते असें समजणें हा मनुष्याचा मूर्खपणा नव्हे काय ? आणि ईश्वर खरोखरच इतका हलकट असला तर त्याचे गोडवे गाणें हाहि हलकटपणाच नव्हे काय ? त्याला भिणें फारतर क्षम्य होईल. त्याची स्तुति करणें हा नीचपणा आहे

एखादी स्त्री विधवा झाल्यास तिने संसार असार आहे असें मानून ' हरि हरि ' म्हणत काळ कंठावा, हा या काव्याचा मथितार्थ आहे. विधुरांनीहि तसेंच करावें असेंहि कवि म्हणतात आणि ज्यांना राहवतच नसेल त्यांना ' नित्याचें जीवन व्यतीत करण्याची ' परवानगी त्यांनी मोठ्या उदार मनाने दिली आहे. या लेखकाचें वय काय आहे हें माहीत नाही, पण ते निदान मनाने तरी जरूर म्हातारे झालेले आहेत हें या काव्यावरून उघड होतें. या म्हातारपणच्या गप्पांकडे तरुणांनी लक्ष द्यायचें बिलकुल कारण नाही. पारमार्थिक सुखावर विसंबणे म्हणजे हातचें सोडून पळत्याच्या पाठीमागे लागण्यासारखें आहे. जोपर्यंत त्यांत दुसऱ्याचें नुकसान नाही तोपर्यंत शारीरिक सुखावर देखील आपला हक्क आहे, मग मनोवृद्ध लोक पाहिजे त्या शिव्या देवोत. लेखक प्रस्तावनेंत म्हणतात, ' अलीकडे मानवी जीवनाचें ध्येय वैषयिक बनत चाललें आहे, ' ' अलीकडे केवळ विषयालाच जे प्रेम समजण्यांत येतें तें मात्र वाईट, ' वगैरे. हें सर्व खोटें असून म्हाताऱ्या मनाचें द्योतक आहे. नैतिक दृष्ट्या तरुण पिढीचें वर्तन जुन्या पिढीपेक्षा चांगलें असतें, हें विधान जुन्या पिढींतील श्री. चाफेकर यांनी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून केलेलें आहे, तेव्हां श्री. बेलसऱ्यांनी केलेली तरुण पिढीची नालस्ती अक्षम्य आहे. निर्माण केल्याशिवाय कोणतीहि वस्तु होत नाही, म्हणून जगाला

उत्पन्न करणारा ईश्वर कल्पिला पाहिजे, असें म्हटल्यावर, ईश्वराला कोणीं निर्माण केला, हा साधा प्रश्न ज्याला सुचत नाही, तो युक्तिवाद काय करणार? जग आपोआप होत नाहीं, तर ईश्वर तरी आपोआप कसा होतो? कीं त्याला मनुष्याने निर्माण केला असें समजायचें? एकंदरींत अंधश्रद्धेपलीकडे या पुस्तकांत कांही नाही आणि ग्रंथकर्त्यांच्या अंधश्रद्धेमुळे विधवांनी ईश्वरभक्तीचें अत्यंत निरुपयोगी जीवन कां कंठावें हें समजत नाही. यांतील उपदेशही फोल आहे आणि यांत आम्हाला फारसें कवित्वहि दिसत नाही. हें पुस्तक सर्व दृष्टींनी टाकाऊ झालें आहे.

२. **नवे डोळे,** लेखक, पुरुषोत्तम विश्वनाथ रहाळकर, प्रथम प्रकाशन, महाराष्ट्र नाट्यमंदिर, नासिक. किंमत १२ आणे.

हें तीन अंकी नाटक प्रत्येक अंकांत एकच प्रवेश असल्यामुळे रचनेच्या दृष्टीने जरी आधुनिक आहे, तरी यांतील विचार मात्र निःसंशय पुरातन आहेत. मतप्रचाराने कलेला कसा हरताळ लागतो, याचें हें नाटक उत्कृष्ट उदाहरण आहे. बरें, मतप्रचाराला परिणामी करायला जी युक्तिवादाची जोड लागते, तिचा यांत कोठें मागमूसही नाही. एखादी आधुनिक नायिका घेऊन तिच्या तोंडांत कांही तरी भरमसाट विचार घालून त्याला नवमतवाद म्हणायचें, नंतर तशा वागणुकीचे दुष्परिणाम दाखवायचे आणि नंतर तिला पश्चात्ताप करून तिच्या तोंडून वदवायचें कीं जुनें होतें तेंच ठीक आहे. ही या नाटकाची पद्धत आहे. मतप्रचारांतही कलेचा आभास उत्पन्न करण्याला जें नितांत कौशल्य लागतें, त्याचा या नाटकांत पूर्ण अभाव आहे आणि यामुळे मतप्रचाराच्या दृष्टीनेहि याचा निष्पक्षपाती मनुष्यावर परिणाम होणार नाही. प्रास्ताविकांत नाटकांतलेच जे उतारे दिले आहेत, त्यावरून लेखकाची भूमिका ध्वनित होते. त्यांतील पहिलें वाक्य असें आहे की 'समाजाचा पाया नीतिमत्तेवर स्थिर असावा.' याचा कांही अर्थ होतो अशी लेखकाची कल्पना दिसते, परंतु नीतिमत्ता या शब्दाचाच अर्थ जेथे स्थिर नाही, तेथे समाजाचा पाया डळमळीतच राहणार हें उघड आहे.

त्यांतलेंच आणखी एक वाक्यः ' पण म्हणून समाज, संस्कृति, यांतील अगदी प्राथमिक प्रयोगांची पुन्हा उजळणी करण्याचें कारण नाही, कारण मागच्या प्रत्येक पिढीच्या अनुभवाने शहाणे होऊन, आलेल्या अडचणींचा निरास करून पुढची पिढी संस्कृतिपथाचा पुढचा टप्पा गांठीत असते. म्हणून अस्थिर, चंचल स्वरूपाचा आधुनिक विचारांचा झंझावात आणि अविचारी अंधश्रद्धेमुळे जीवंत विचार करण्याची धमक नसलेल्या जीर्ण मतांची मरुभूमि या दोन्ही गोष्टी वर्ज केल्या पाहिजे...दोन्ही टोंकांची पराकोटि उपयोगी नाही; व्यावहारिक सत्य म्हणजे युक्तमध्यच. ' पुढची पिढी पुढचा टप्पा गांठीत असते हें यांना सामान्यतः कबूल आहे, पण हल्लींची नवीन पिढी तेंच करीत आहे हें मात्र कबूल नाही, कारण ती पिढी लेखकाच्या कोत्या विचारांच्या पुढे चालली. ' दोन्ही टोंकांची परा कोटि उपयोगी नाही ' हें वाक्य दिसायला सुबक दिसलें तरी अर्थाला इतकें फोल आहे की तें कोणत्याही पक्षाला स्वतःकडे लावतां येईल. उदाहरणार्थ स्त्रीपुरुषसंबंधांत स्वातंत्र्यवादी देखील असें म्हणतील की अनेकांशीं संबंध ठेवला पाहिजे अशीहि सक्ति नको आणि एकाला चिकटून राहिलें पाहिजे अशीही नको. या पराकोटि सोडून, पाहिजे तर एकाला चिकटून रहावें, नको तर राहूं नये, हें युक्तमध्यच बरें. जे आपल्याला पसंत नसतील त्यांना ' प्राथमिक प्रयोग ' म्हणून त्यांची वाट लावण्याची युक्ति मोठीशी शहाणपणाची नाही. चुका सर्व पूर्वी दुरुस्त झाल्या तेव्हा आता कांही बदलण्याचें कारण नाही, असा अर्थ यांतून निघेल आणि समाजाच्या कोणत्याही स्थितींत असेंच म्हणतां येईल. सतीची चाल बंद होऊन कांही फार वर्षे झालीं नाहीत आणि ती सरकारी कायद्याने बंद केली, समाजाने केली नाही. तेव्हाही असेंच म्हणतां आलें असतें कीं पूर्वी सर्व प्रयोग होऊन सतीची चाल चांगली म्हणून आपल्या पूर्वजांनी ठरवली, त्यांत आता ढवळाढवळ करण्याचें कारण नाही. ' स्त्री जीवनाची चित्-शक्ति आहे, पुरुष हें जीवनाचें सत्व आहे. ' अशा प्रकारच्या वाक्यांचा आमचे मतें अर्थ होत नाही. नजरबंदी करणाऱ्या गारुड्याच्या बडबडीइतकच त्यांचें महत्व आणि तोच त्यांचा उपयोग. ' सत्याचा मूळ पाया ज्यांत कधीहि सुटत नाही

बदलत्या परिस्थितींत बाह्य मार्गांत जरूर ते फरक करून नित्य नव्याने सत्याचा अनुभव ज्यांत सारखा येत राहतो, तोच खरा जीवंत नवमतवाद.' हे लेखक 'सत्य' याचा अर्थ काय करतात कोणाला ठाऊक, पण सत्य याचा सरळ अर्थ घेतल्यास त्यांत ईश्वर, धर्म वगैरे मात्र येणार नाहीत.

नाटकांतल्या पात्रांच्या भाषणांतलेच उतारे प्रस्तावनेंत छापून त्याबद्दल त्यांचे आभार मानणें ही शक्कल नवीन आहे. स्वतःला इतके उत्तम विचार सुचल्याबद्दल हें स्वतःचेंच अभिनंदन आहे. स्वतःला सुधारक समजणारे या नाटकांतले बाबा-साहेब देशमुख हे एके दिवशीं मुलीला कांहीएक बातमी दिल्याशिवाय विनायक सिंधे नांवाच्या गृहस्थांना तिला पहायला बोलावतात व स्वतः त्या वेळीं घरीं नसतात. तिची एक मावशी तेथे येते आणि हे गृहस्थ तिला पहायला आल्याची बातमी देते. बाप आपल्याला कळवल्याशिवाय असें कांही करील हें खरें न वाटून ती त्यांच्याशीं उद्धटपणाने वागते. इतक्यांत बाप येऊन समजूत घालण्याचा प्रयत्न करतो. तिची समजूत पटत नाही, परंतु विनायकराव तरी देखील आपलें तिच्यावर प्रेम बसल्याचें सांगतो. या वेळीं बापाने मुलीला सांगितलेली सबब म्हणजे त्याने तिला द्यायला म्हणून सकाळीं लिहिलेली चिठ्ठी चुकून त्याच्याच खिशांत राहिली आणि त्याला घरीं यायला सरकारी कामामुळे उशीर झाला. ही लंगडी सबब ती अर्थातच मान्य करीत नाही आणि सुधारक म्हणवणाऱ्या बापाला ती मुळीच शोभत नाही. विनायकराव कोठे पळून जात नव्हते आणि त्याला एकदम पहायला बोलावणें म्हणजे मुलीचा उपमर्द करणें होय. लेखकाला यांत कांहीच गैर वाटत नाही, यावरून त्यांची भूमिका दिसते. नाटकाचा नायक विनायक सिंधे हा दुसऱ्या एका बुरसटाच्या मदतीने 'सहकारी-तरुण संस्थेची संरक्षण शाखा' काढून एका डाक्टरणीचें संकटांतून रक्षण करतो आणि स्त्रिया अबला असल्यामुळे पुरुषांच्या मदतीची जरूरी सिद्ध करतो. अत्याचार फक्त स्त्रियांवरच होतात असें नाही, हें लेखकास माहीत नसेल असें नाही. पण स्त्रियांना शील रक्षण करायचें असतें आणि पुरुषांना शील असें कांही नसतेंच, किंवा सर्व पुरुष सशक्त असतात अशी लेखकाची कल्पना असावी.

पुरुषांवर कोणी अत्याचार केलाच तरी तो वेगळ्या प्रकारचा असेल, किंवा पुरुष फारतर ठार मरेल, त्याला मोठीशी हरकत नाही. सर्व पाप काय तें समागमांत सांठवलें आहे, तेव्हा त्यापासून स्त्रियांचें रक्षण करणें हें जगांतील सर्वांत मोठें पुण्य; असे जीर्ण नीतीचे अडाखे आहेत. संरक्षणसंस्था जर काढणें जरूर असेल तर तिनें स्त्रियांप्रमाणे पुरुषांचेंहि रक्षण केलें पाहिजे. नाटकांतील डाक्टरीण सुमति ही पुरुषावर अंमल चालवण्याकरता एका वेडप्याशीं लग्न करण्याचा घाट घालते. याच्याच उलट सर्व सनातनी मूर्ख आणि नवमतवादी शहाणे दाखवून नाटकांत नवमतवादाचा विजय दाखवणें कठिण होणार नाही, आणि मतप्रचारानें कलेचा विध्वंस होतो तो असाच. या नाटकांतला एक संपादक ' धटिंगण ' नांवाचें एक पत्र काढतो. संपादक स्वतःच्य आवडीचें नांव पत्राला देईल आणि ' धटिंगण ' हें नांव आवडणारा मनुष्य मूर्खच असला पाहिजे. या नाटकांत बुरसट मताच्या लोकांशिवाय बाकी सर्व पात्रें मूर्ख दिसतात. एका पक्षाला मूर्ख ठरवण्यांत देखील थोडींबहुत अक्कल दाखवल्यास अधिक यश मिळेल. परंतु याचें लेखकांना पुष्कळ वेळां भान रहात नाही. याचा एक मासला महाभारतांत देखील सांपडतो. कोणतींहि आईबापें आपल्या मुलांचीं नांवें दुर्योधन, दुःशासन, अशीं वाईट अर्थांचीं ठेवतील असें वाटत नाही, परंतु व्यासानें तशीं ठेवलीं आहेत कारण ते लोक वाईट दाखवायचे आहेत ! ही कला नव्हे.

---

# पत्रव्यवहार

१.

१. मंत्रसामर्थ्य काल्पनिक म्हणावें तर भानामतीचे प्रयोग कसे यशस्वी होतात ? मी देखील मंत्रतंत्र, भूतबाधा वगैरेंवर विश्वास ठेवणारा नाही, पण या गांवांत बरेच प्रयोग पाहण्यांत आले. सध्या येथे अशा ३ केसेस आहेत, २ हिंदु व १ मुसलमान. त्यांच्या अंगावर फोड आले व हात सुजलेले होते.

विचारल्यावर असें कळलें की अंगावर त्रिव्याच्या फुल्या येतात व त्यांत पाणी भरतें. जिच्यावर भानामतीचा-प्रयोग केला आहे तिचेच फक्त पेटींत ठेवलेलें कपडे जळतात व केव्हा केव्हा ती झाडावर जाऊन बसते असेंहि घरचीं माणसें म्हणतात. हें सगळें होण्याचें काय कारण ? २. जुलैच्या अंकांत आपण लिहिलें की रेतस्खलनाशिवाय देखील पुरुषाचें समाधान होतें. याच्या विरुद्ध माझा व सहचारिणीचा अनुभव आहे. दुसऱ्यांदा जास्त वेळ लागतो व तिसऱ्यांदा स्खलन होत नाही. सरासरी महिन्यांतून किती वेळां समागम होणें नैसर्गिक आहे ? मुलींना कितव्या वयांत ( कमींत कमी ) समागमाची इच्छा होते ? इच्छा झाल्यावर समागम होण्यास काय हरकत आहे ? हाच कायदा मुलांनाही लावतां येईल काय ? सुंदर स्त्री आपणांस पाहिजे असें पुरुषांना वाटतें, तसेंच स्त्रियांना सुंदर पुरुषासंबंधी वाटतें काय ? किती स्त्रिया हें प्रामाणिकपणें कबूल करतील ? जास्तींत जास्ती किती वेळां सुदृढ स्त्री ( मेंदूवर वाईट परिणाम होऊं न देतां ) समागम करूं शकते ? ३. जोपर्यंत शास्त्रज्ञाने मरण ताब्यांत आणलें नाही तोंपर्यंत ईश्वरी शक्तीस मान वांकवावी लागेल. एकाच जोडप्याचीं मुलें कांही बुद्धिमान व कांही अल्पबुद्धीचीं निपजतात, एक सात्विक व दुसरा आसुरी वृत्तीचा निपजतो, याचें कारण काय ? सृष्टीचें संपूर्ण ज्ञान मनुष्यास होणें शक्य आहे काय ? असल्यास आपल्या मतें तें केव्हा होण्याचा संभव आहे ? आज शास्त्रज्ञ जे सृष्टीचे नियम व सिद्धांत समजतो तेच उद्या दुसरा शास्त्रज्ञ चुकीचे ठरवतो. तात्पर्य ईश्वरी सृष्टि अगाध आहे व तिचें पूर्ण ज्ञान मनुष्यास होणें शक्य दिसत नाही. यावर आपलें काय म्हणणें आहे ? कांही मुलें जन्मतःच गणितज्ञ असतात. असें कां व्हावें ? याला समाधानकारक उत्तर आपल्याजवळ आहे काय ? आपला......

उ १. आपल्या वर्णनावरून आपण विश्वास ठेवणारे नाही असें दिसत नाही. तसे नसतां तर कोणी मंत्रसामर्थ्याने अमुक करतों असें म्हणाल्यास त्याला आपण लफंगाच समजलां असतां, आणि मंत्रसामर्थ्यावर विश्वास ठेवणा-

ची कोठेतरी फसवणूक होत आहे असेंच आपणास वाटलें असतें. अशा बाबतींत घरचीं माणसेंहि खोटें बोलण्यास कमी करीत नाहीत असा अनुभव आहे. लहान मुलें जशीं आपणाकडे इतरांचें लक्ष ओढून घेण्याचा प्रयत्न करीत असतात, तशीच कांही अंशीं कित्येक स्त्रियांचीहि मनःप्रवृत्ति असते. असे चमत्कार झाले म्हणजे त्यांना जें महत्व मिळतें, तें मिळवण्यास त्यांना इतर मार्ग नसतात. अशा स्थितींत खरें काय होतें हें समजणें कठिण असतें आणि त्या स्त्रीवर पहारा ठेवला तरच तें समजेल. थोडेंबहुत वैद्यकीय व शास्त्रीय ज्ञान आणि गुप्त पोलीसाचें चातुर्य अंगांत असलेलाच मनुष्य अशीं कोडीं उलगडूं शकेल. आपल्यासारखा भोळा मनुष्य तेथे फसणारच. २. जुलैच्या अंकांत फक्त कांहींचा अनुभव दिला आहे, आपल्या अनुभवाने त्याला बाध येत नाही. महिन्यांतून शून्यपासून ९० वेळांपर्यंत समागम होणें नैसर्गिक म्हणावें लागेल, असें मारी स्टोप्सच्या म्हणण्यावरून दिसतें. थकवा आल्यास अतिरेक समजावा असें आम्हीं अनेक वेळां सांगितलें आहे. ऋतुप्राप्तीनंतर समागमास हरकत नसावी असें तज्ज्ञांचें मत आहे. मुलाचे बाबतींत अशी निश्चित खूण नसते, तथापि 'आधुनिक कामशास्त्र' या पुस्तकांत यासंबंधी विवेचन सांपडेल. पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही वाटतें असें धरून चालण्यास हरकत नाही. तथापि हजारांत एक देखील हें कबूल करणार नाही. हा सामाजिक समजुतींचा परिणाम आहे... कांहीं वेश्या एका रात्रींत १०० वेळां देखील समागम सहन करूं शकतात असें म्हणतात. परंतु यांतही वैयक्तिक फरक अतिशय असतो. ३. आम्हाला न सुटणारे कितीहि प्रश्न विचारले तरी त्यांतून ईश्वराचें अस्तित्व कसें सिद्ध होतें ? जें आपण सिद्ध करायला निघालांत तेंच 'ईश्वरी सृष्टि' असे शब्द वापरून गृहीत धरतां, हा वादाचा कोणता प्रकार आहे ? शास्त्रज्ञांना जें कांही थोडें समजत असेल तेंही न समजतें तरी देखील ईश्वर सिद्ध होत नाही, हें आपणांस तर्कशास्त्र शिकल्याने समजेल. ईश्वराचें अस्तित्व सिद्ध झाल्यावर त्याची शक्ति आमचेपेक्षा जास्त आहे असें ठरल्यास मान वांकवायची की नाही याचा विचार करतां येईल. **सं.**

२

आपल्या आधुनिक कामशास्त्रांत आपण लिहिलें आहे कीं शिस्नाचे तोंडावरील चामडी दुमडलेली असल्यास व टोंक उघडें असल्यास रोगजंतूंपासून अपाय होण्याची जास्त भीति असते. चामडी अरुंद असल्यामुळें जी सहसा दुमडली जात नाहीं, फक्त समागमाचेच वेळीं दुमडली जाऊन पुनः पूर्ववत येते, ती फायदेशीर आहे असें माझें मत आहे. पुनः आपण त्याच पानावर खाली लिहिलें आहे की ' कांहीं जातींत ही चामडी लहानपणींच कापून काढतात, जसें सुंता वगैरे... जर ही चामडी अरुंद असली तर कापून काढण्याची जरूरी असते.' ती कशाकरता असते याचें उत्तर मला त्यांत आढळलें नाहीं. न कापल्यास संतति होण्यास कांहीं अडथळा होण्याचा संभव असतो काय ? याचा खुलासा केल्यास बरें होईल. आपला......

उ. आपला गैरसमज झाला आहे. कातडी सहज मागे पुढे सरत नसल्यास ती जागा अस्वच्छ राहण्याचा संभव असतो व ती फारच अरुंद असल्यास एकदा मागे गेल्यावर ती अडकून बसून तिच्या दाबानें त्रास होतो. अशा वेळीं ती कापून घेणेंच भाग पडतें. स्वच्छता ठेवणें कठिण झाल्यास रोग होण्याचा संभव असतो म्हणूनहि ती कापून घेणें इष्ट असतें. ती असली तरी संततीला प्रतिबंध होत नाही. सं.

---

# शारदेचें पत्र

केळकर म्हणतात विधवांना जर रहावतच नसेल तर त्यांनीं पुनर्विवाह करावा. सरदेसाई म्हणतात ब्रह्मचर्य पाळून संततिनियमन करणें हा सर्वांत उत्तम मार्ग, आणि ज्यांना तें अशक्यच असेल त्यांनी पाहिजे तर कृत्रिम साधनें वापरावीं. या दोघांच्याहि म्हणण्यांतलें तत्त्व हेंच कीं एकंदरींत समागम हा वाईटच, पण ज्यांना राहवत नसेल त्यांना तो क्षम्य आहे. केळकरांसारख्या त्रिशंकु पंथाच्या लोकांनी कांहीहि म्हटलें तरी त्याला फारसा अर्थच नसतो आणि केळकर राज-

कारणी मनुष्य असल्यामुळे त्यांचीं मतें राजकारणाच्या सोईप्रमाणे पाहिजे तशीं बदलतील देखील. पण सरदेसायांना समतोल विचार करतां येतो अशी माझी आजपर्यंत समजूत होती, ती खोटी ठरली. याचा अर्थ इतकाच दिसतो कीं, कामवासनेच्या बाबतींत समतोल विचार पुष्कळ समंजस माणसांना देखील अशक्य होतो. मी म्हणतें केळकरांची बुद्धि कदाचित् हिंदुमहासभेंत केळीं खायला गेली असेल, पण सरदेसायांना तर तीहि सबब नाही आणि राजकारणाचीहि नाही. मग असें कां होतें ? कीं ' साठी आणि बुद्धि नाठी ' म्हणतात तेंच खरें ? त्यांत गंमत अशी आहे कीं केळकर स्वतः विधवा नसल्यामुळे विधवांना खुशाल ब्रह्मचर्याचा उपदेश करण्यांत त्यांचें कांहीच नुकसान नाही. ब्रह्मचर्य हा एक अत्यंत कृत्रिम उपाय आहे ही गोष्ट सोडून देऊन सरदेसायांचा उपदेश पाहूं गेलें तर संततिनियमन करणारांपैकी ब्रम्हचर्य कोण पाळतो आणि कृत्रिम साधनें कोण वापरतो हें समजायला कांहीच मार्ग नाही. आणि शिवाय कांही पुरुष असेहि असतात की संततिनियमनाकरता घरीं मात्र कडक ब्रह्मचर्य पाळतात, पण बाहेर तें पाळण्याचें मुळीच कारण नसतें ! तसा तर देसायांच्या म्हणण्याचा अर्थ नसेल ? तसें असलें तर तें मात्र पुष्कळांना पसंत पडण्याचा संभव आहे. खरें ब्रह्मचर्य म्हटलें तर लोक त्याला तोंडी संमति देतील, पण वागण्याच्या नांवाने मात्र बोंब ! सरदेसायांना तरी निदान हें माहीत असलें पाहिजे की ब्रह्मचर्याचा फुगा आता फुटलेला आहे, त्यापासून कोणताहि फायदा नसून नुकसान मात्र होतें, हें जगांतील सर्व तज्ज्ञांना माहीत आहे. त्यांपैकी कांही धार्मिक कारणां करता कदाचित् खोटें बोलतील, कारण धर्मापुढे प्रकृतीचें महत्त्व काय आहे ? पण ज्यांना ज्यांना यांत कांही समजतें आहे आणि खरें बोलण्याची इच्छा आहे, ते सर्व असेंच सांगतात कीं नियमित समागम आरोग्याच्या दृष्टीने इष्ट आहे तो राहवत नसेल त्यांनीच करावा म्हणणें हास्यास्पद आहे. तसें म्हणायचें असल्यास त्याचबरोबर असेंहि म्हणावें लागेल कीं ज्यांना राहवत नसेल त्यांनीच फक्त चांगलें अन्न खावें, ज्यांना राहवत नसेल त्यांनीच व्यायाम करावा, ज्यांना राहवत नसेल त्यांनीच स्नान करावें, ज्यांना राहवत असेल

त्यांनी या गोष्टी करूं नये. त्यामुळे त्यांची प्रकृति बिघडेल खास, पण लवकर स्वर्गांत जातां येईल हें काय थोडें आहे ? सरदेसायांच्या म्हणण्याप्रमाणे वागायचें झाल्यास सबंध आयुष्यांत दोन तीन, फारतर पांच सहा वेळां समागमास परवानगी मिळते, हें सरदेसायांना माहीत नाही काय ? कारण यापेक्षा जास्त मुलें पोसण्याचें किंवा बाळंतपणें सोसण्याचें सामर्थ्य किती लोकांना असतें ? असें करावें म्हणणें म्हणजे उचलली जीभ आणि लावली टाळयाला असा प्रकार आहे ! यावर आता असें पुकारण्याचा प्रसंग माझ्यावरच आला आहे की प्रकृतीच्या दृष्टीनेच काय, पण मानसिक उल्हासाच्या दृष्टीनेहि समागमाची अत्यंत आवश्यकता आहे आणि त्याची संधि सर्वांस मिळाली पाहिजे, आणि परिस्थितीमुळे ज्या स्त्रीपुरुषांना विवाह शक्य नसेल त्यांनी त्यासंबंधी इतर व्यवस्था करणें जरूर आहे. तशी करण्यांतच व्यक्तीचा आणि समाजाचा फायदा आहे. या बाबतींत समाजाच्या आडमुठेपणामुळे थोडी बहुत प्रतारणा करणें भाग पडलें तर तेंहि मी पाप मानीत नाही. ती उत्तम गोष्ट आहे म्हणूनच करा. राहवत नाही म्हणून, पाप असलें तरी क्षम्य आहे असें समजून, करूं नका. जी गोष्ट पाप समजून कराल तिचा परिणाम वाईट होण्याचा संभव फार. ही गोष्ट न्याय्य म्हणून सरळ मनाने केली तर ती निःसंशय हितकर आहे. मग केळकर किंवा सरदेसाई काय वाटेल तें म्हणोत.

उमरावतीचें शिवराळ साप्ताहिक ' विदर्भ ' तुला कदाचित् माहीत नसेल. त्यांत एकदा ' अशिक्षित पत्नीशीं काडीमोड व सुशिक्षित पत्नीशीं पुनर्विवाह ' या मथळ्याखाली एक पांच कालम अग्रलेख आला होता. या संपादकांना खऱ्याखोट्याचा विधिनिषेध असतो असें दिसत नाहीं. कोणीकडून शिव्या द्यायच्या हाच त्यांचा धंदा. वास्तवीक अनेक बायका करण्याची वहिवाट चांगली सनातनी आहे, तेव्हा त्यांत पहिली बायको अशिक्षित आणि दुसरी सुशिक्षित असली तर काय बिघडलें ? दुसरी बायको अमुकच कारणांकरता केली पाहिजे हें सांगण्याचा या संपादकांना काय अधिकार आहे ? हें करणाराच्या खुषीचें काम आहे. दुसरी बायको केली, तेव्हा पहिल्या बायकोंत कोणताहि एखादा दोष

असेल किंवा एकीबर भागत नसेल ! त्याचा जाब संपादक कोण विचारणार ? ते म्हणतात असे पुरुष स्वतःच्या कामुक लालसा स्वच्छंदपणें पुरवून घेण्याकरता मोकळें मैदान निर्माण करण्यासाठी प्रथम पत्नीवर कांहीतरी आरोप करीत असतात. एक बायको अधिक करण्यांत स्वच्छंदपणा कसा झाला ? स्वच्छंद माणसाचें दोन बायकांवर तरी कसें भागणार ? हिंदु नवऱ्याला स्वच्छंद वागण्याची मुभाच असते. त्याला दुसरी बायको करण्याची काय जरूर ? उलट बायको केल्यामुळे विदर्भाच्या संपादकांना शिव्या देण्याची संधि मिळाली. त्याऐवजी रखेली ठेवली असती तर त्याला कोणी विचारलेंहि नसतें. अशिक्षित किंवा कुरूप बायका असलेले कांही पुढारी तशाच स्थितींत सार्वजनिक कामें करतात अशीं कांही उदाहरणें संपादकांनी दिलीं आहेत. या उदाहरणांचा काय उपयोग ? त्यांनी दुसऱ्या बायका केल्या नसल्या तरी त्यांचें सदाचरण त्यावरून कसं सिद्ध होतें ? पुष्कळ पुढाऱ्यांचीं कांही ना कांही कुलंगडीं असतात आणि तीं कधीकधी बाहेरहि पडतात, याची वऱ्हाडांतल्या लोकांना तरी ताजी आठवण असली पाहिजे ! या शिवराळ संपादकांनी जातां जातां कॉलेजियन् तरुणींना शिव्या दिल्या आहेत. ते म्हणतात, ‘ बाजारचा मेवा हवा त्याने खावा, असेंच नैतिक आचरण शेंकडा ९९ कॉलेजियन् तरुणींचें नसेल कशावरून ? हें कटु सत्य आहे.’ माझे मतें हा हलकटपणा आहे. ‘ विदर्भ ’ पत्राचे संपादक हलकट नसतील कशावरून ? असें विचारणें हा पुरावा नव्हे. पुराव्याशिवाय असे बेजबाबदार आरोप करणें हा हलकटपणा आहे. याचा अर्थ एकतर संपादकांची फक्त दुराचरणी मुलींशींच ओळख आहे, किंवा ते काय लिहितात त्याचा त्यांनाच अर्थ कळत नाही. यापैकी कांहीहि असलें तरी संपादकांचा दर्जा त्याने वाढत नाही.

संजीवनींतील वायुपुत्राने प्रभातच्या रसिक बातमीदाराची री ओढून ‘ प्रत्येक जाणत्या मुलींच्या पालकाने आपल्या मुलीला या दिवसांत रेनकोट जरूर घेऊन द्यावा ’ अशी सूचना केली आहे. रसिकच आहेत ते ! अजाणत्या मुली त्यांना दिसतातच कशाला ? त्या पावसांत भिजून आजारी पडल्या तरीहि त्यांची हरकत

नाही, पण या अजाणत्या मुलीच कांही दिवसांनी जाणत्या होतात, तेव्हा रसिकांनी थोडें दूरदर्शित्व दाखविल्यास त्यांचीहि थोडी काळजी घेतली पाहिजे हें ते कबूल करतील.

---

गोव्याच्या एका नव्या मासिकांत संपादकांनी चर्चेकरता कांही प्रश्न विचारले आहेत. त्यांत एक असा आहे की अतिथीच्या भुकेला जसें अन्न द्यायचें, तसें त्याच्या प्रेमपिपासेला गृहिणीने आपलें शरीर अर्पण करावें की नाही ? या प्रश्नाला एका सौ. ने उत्तर लिहिलें आहे. अर्थात् तें सौ. ने लिहिलें आहे यावरून तें काय असेल हें तुला समजलेच सौ. बिचारी दुसरें काय लिहिणार ? पण आपल्याला युक्तिवाद येतो या कल्पनेने ती हास्यास्पद झाली आहे. ती म्हणते उच्च दर्जाचें प्रेम मानसिक असतें, त्याचा शरीराशीं संबंध नसतो. तेव्हा अतिथीने शरीराची अपेक्षा कां करावी ? हें जर खरें, तर पतिपत्नींचें प्रेम नीच दर्जाचें असलें पाहिजे, कारण सामान्यतः पतिपत्नींचा शरीरसंबंध असतो. तो केवळ प्रजोत्पादनापुरताच असतो असें त्यांचें म्हणणें असलें तर हें निखालस खोटें आहे. मुलेंच पाहिजे असतील तर आयुष्यांत तीनचार वेळां शरीरसंबंध पुरे होईल आणि प्रेमाचा जर शरीराशीं कांही संबंध नसेल, तर प्रेम नसतांना देखील कोणाशींही संबंध ठेवायला काय हरकत आहे ? शरीराला इतकें महत्व कशाला द्यायचें ? आणि अतिथीला भार्या अर्पण करण्याची पद्धत अत्यंत सनातन आहे हें या सौ. ला कसें माहीत नाही ? आर्यस्त्रीला आर्यसंस्कृतीची माहिती असूं नये काय ?

तुझी **शारदा.**

---

**मतप्रचाराच्या दृष्टीने कोणाही वर्गणीदारास मासिकाच्या प्रती इष्टमित्रांस फुकट वांटण्याची इच्छा असल्यास त्यांनी तसें कळवावें. प्रत्येकीं १० प्रती आमचे खर्चाने पाठवूं. कोणत्या प्रती पाठवणें हें आमच्या मर्जीवर राहील. —संपादक.**

# खोट्या जाहिराती.

———×०×———

खोट्या जाहिरातींचें पीक थोडेंबहुत सर्वच देशांत असतें, तथापि हिंदुस्थानांत अज्ञान व भोळसटपणा यांचा प्रसार विशेष असल्यामुळे खोट्या औषधांचें प्रमाण जास्त असल्यास नवल नाही. हल्ली बऱ्याच वृत्तपत्रांचें जीवन खोट्या जाहिरातींवर व भविष्यांवर अवलंबतें हें प्रसिद्धच आहे. यासंबंधी पुढील उतारा डॉ. रॉबिनसन् यांच्या मासिकांतून घेतला आहे.

" कांही अज्ञानग्रस्त देशांपेक्षा आमची थोडीतरी अधिक प्रगति झाली आहे यांत शंका नाही. हिंदुस्थानांतून पाठवलेल्या कांही औषधांसंबंधी एक वाटोळें मजकडे आलें आहे. आमच्या देशांत जर अशा प्रकारचें वाटोळें कोणी पाठवलें तर फसवून पैसे मिळविण्याचा प्रयत्न केल्याबद्दल तो ताबडतोब तुरुंगांत जाईल. मी या चोपड्याकडे लक्षच दिलें नसतें, पण तें अमेरिकन लोकांकडे जातें आणि त्यांतील औषधाचे वर्णनांत कांहीं तथ्य आहे की सर्वच सोदेगिरी आहे, याबद्दल कांहींनी माझें मत विचारलें आहे या १६ पानी चोपड्यांतील भिकार औषधांसंबंधी ' फसवणूक ' हा शब्द फारच फिका वाटतो. त्यापैकी एकाचें नांव " सेक्स् पर्ल् ' असें असून त्याची किंमत ५ डॉलर आहे आणि ' कायमचें शक्तिवर्धक ' असें त्याचें वर्णन आहे. ' रतिसमयीं तें तोंडांत धरलें असतां स्तंभनशक्ति वाढते, ' पण याने केवळ समागमशक्ति वाढते इतकेंच नाही तर त्याने रक्त शुद्ध होतें आणि परमा, गर्मी, मूळव्याध, दमा आणि स्त्रीपुरुषांचे इतर सर्व रोग बरे होतात. नंतर कायमचें संततिनियमन करण्याकरता एक औषध आहे. हें औषध फक्त ७ दिवस घेतलें की पुनः कधीहि गर्भ रहात नाही. त्याचें वर्णन असें. ' हें औषध वनस्पतीचे असून स्त्रीने तें ७ दिवस घेतलें असतां गर्भधारणा कायमची बंद होते. त्याने एकंदर प्रकृतीवर किंवा मासिक स्रावावर कांही परिणाम होत नाही. हें एका संन्याशाकडून मिळवलेलें आहे आणि यापासून

इजा होणार नाही अशी आम्ही हमी घेतों. ' नंतर कांही कामगुटिका आहेत. ' यांतील एक दररोज घेतली असतां घटस्फोटाची जरूर नाही. ' ' ही समागमापूर्वी कांही तास घेतली असतां पुरुषांचे अंगांत इतकी शक्ति व उत्साह येतो की बिलकुल अशक्तता आल्याशिवाय एका रात्रींत पांचसहा वेळां समागम करतां येतो. याने थकल्याभागलेल्या म्हाताऱ्यांना पुनः तारुण्य येतें. ' नंतर एक चूर्ण आहे. ' या चूर्णाने कोणतीहि वृद्ध किंवा मध्यम वयाची स्त्री कांही मिनिटांत कुमारीसारखी होते. यापासून बिलकुल इजा होत नाही आणि विवाहसुख उपभोगण्याकरता प्रत्येक पुरुषाला याची जरूर आहे. याने स्त्री तुमची कायमची गुलाम बनून राहील. ' नंतर एक तेल आहे. ' हें समागमाचे वेळीं पुरुषाचे जननेंद्रियास लावलें असतां संभोगसुख शतपट वाढतें; आणि शिवाय स्त्री तुमच्याच प्रेमाची हांव धरून तुमची कायमची गुलाम होईल. '

याच जातीचीं आणखी कांही औषधें आहेत. 'नपुंसकत्वावर तेल', 'स्तंभनगुटिका' वगैरे. याशिवाय क्षयरोग, दमा, मलेरिया, मस्तकशूळ, आमांश, मधुमेह वगैरे रोगांवर रामबाण औषधें आहेत तीं वेगळींच. पण यांत दोन औषधें अशीं आहेत कीं अशा जाहिराती देणारांना दहा वर्षे तुरुंगांत पाठवावें एक परम्यावर औषध. ' रोग कितीहि जुनाट असला तरी दोन दिवसांत हटकून बरा होतो. ' आणि एक गर्मीवर औषध. ' यांत कोणताही हानिकारक पदार्थ नसून रोग एका आठवड्यांत साफ बरा होतो. '

या हरामखोर सोद्यांना काय म्हणावें ? लोक पैशाकरता काय करणार नाहीत ? हे वैदु अशा धडधडीत खोट्या आणि अशक्य गुणांच्या जाहिराती देण्यास कचरत नाहीत याचें एक कारण असें की अशा औषधांकरता पैसे देणारे लोक अत्यंत निर्बुद्ध आणि अज्ञ असणार हें त्यांना माहीत असतें; आणि दुसरें असें की नपुंसकत्व, परमा, गर्मी यांवर औषधें मागवणारा मनुष्य त्यांच्यावर फसवणुकीबद्दल फिर्याद करूं शकत नाही, कारण हे रोग किंवा दोष आपणांत आहेत असें कोण उघडपणें कबूल करील ? हेंच या चोरांचें भांडवल असतें आणि


यामुळेच ते पाहिजे तितकें खोटें बोलण्यास बिलकुल भीत नाहीत. आमच्या देशांत अशा खोट्या जाहिराती टपालांतून पाठवल्या तर तेवढ्यावरच तुरुंगांत जावें लागेल. आमच्या पद्धतींतहि सुधारणा करतां येणार नाही असें नाही, तथापि कांही देश आमच्यापेक्षा पुष्कळच मागसलेले आहेत यांत शंका नाही. ”

# व्यायाम–१७

४०. हा व्यायाम म्हणजे वल्हें मारतांना होणाऱ्या अंगविक्षेपांचें अनुकरण आहे आणि काळजीपूर्वक केल्यास कठिण आहे. आकृति ३४ मधे दाखवल्याप्रमाणे ढुंगण जमिनीवर टेकून, गुडघे हनु वटीच्या जवळ येतील अशा रीतीने पाय दुमडून, पाय जमिनीपासून वर उचलावे, आणि ते व्यायाम पुरा होईपर्यंत पुनः जमिनीला लागतां नये. हात गुडघ्यांच्या बाहेरून पु ताठ करावे, आणि वल्हें हातात आहे असें समजून मुठी मिटाव्या. नंतर (१) आकृति ३५ मधे दाखवल्याप्रमाणे पाय लांब करावे, कोपरांत हात वांकवून ते शक्य तितकीं मागे न्यावीं व मुठी छातीच्या बाजूला आणाव्या. या वेळीं डोकेंही मागे जातें आणि दृष्टि आकाशाकडे वळते. हे सर्व करतेवेळीं श्वास आंत घ्या. नंतर (२) पुनः मूळपदावर या आणि या वेळीं श्वास बाहेर सोडा. असें तीनचार वेळां करा.




आकृति ३४



आकृति ३५

४१. ताठ उभे रहा आणि आकृति ३६ मधे दाखवल्याप्रमाणे हात खांद्या



आकृति ३६

वर ठेवा. म्हणजे कोपराच्या वरचा भाग धडाच्या शक्य तितका जवळ राहिला पाहिजे, आणि हात मनगटांत वांकवून बोटें खांद्यांच्या बाहेरच्या बाजूवर टेकलीं पाहिजेत. यांत दोन गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत. १. बोटें खांद्यांच्या पुढच्या बाजूला न लागतां बाहेरच्या बाजूला लागलीं पाहिजेत, तरच जरूर तो ताण बसेल; आणि २. कोंपरें बिलकुल वर उचलतां नयेत. नंतर ( १ ) आकृति ३० मधे दाखवल्याप्रमाणे हात ताठ वर उचला. असें करतांना श्वास आंत घ्या. आणि ( २ ) श्वास बाहेर सोडीत हात परत खांद्यांपर्यंत आणा. असें चार वेळां करा.

---

**गरीब बिचारा ईश्वर !** धरणीकंपासारख्या प्रसंगीं ईश्वराचा चांगुलपणा सिद्ध करूं पाहणाऱ्या महात्मा गांधींसारख्या वकिलांची जी तिरपीट उडते ती पाहून त्यांची दया येते. पुढील गोष्टीपासून त्यांना या कामीं खास मदत होईल कॅनडामधील मॉँट्रील शहरीं एकदा एका सिनेमागृहाला आग लागली. तो खेळ मुद्दाम शाळेंतील मुलांसाठी होता. आणि तेथे साहजिकच रोमन् कॅथोलिक पंथाच्या फ्रेंच लोकांचीं बरीच मुलें हजर होतीं. या आगींत सुमारें १०० मुलें जिवंत जळून मेलीं. ईश्वराच्या दयेचा हा विचित्र प्रकार ईश्वराला कमीपणा आणणारा होता, पण कॅथोलिक धर्मगुरूहि वस्तादच होते. त्यांनी असें पुकारलें की मॉँट्रील शहरांत पाप फार वाढल्यामुळे ईश्वराने त्यांना शिक्षा करण्याकरिता असा सूड घेतला ! परंतु याहीपेक्षा जास्त कुशलतेने ईश्वराच्या या अत्याचाराचा खुलासा करण्याकरता एकाने कवन करून सांगितलें की स्वर्गांत देवदूत कमी झाले होते आणि ईश्वराला आणखी देवदूतांची गरज होती आणि लहान मुलें निष्पाप असल्यामुळे मेल्याबरोबर एकदम स्वर्गांत देवदूत होतात. तेव्हा बरींच मुलें एकदम मारणें भाग होतें. काय करील बिचारा ! सिनेमाला आग लावून त्याने आपली गरज भागवली !

( इदे लीव्र )

**संततिनियमनार्थ गर्भपात.** चीन देशांत नुकताच कायदा झाला आहे कीं संततिनियमनाकरता गर्भपात करणें हा गुन्हा नाही.

---

**न्यायाचा एक मासला.** कॅनडामधील कांही भागांत वर्षांतून सहा महिने सर्वत्र बर्फ पसरलेला असतो. या लांबलचक हिंवाळ्यांत गरीब कुटुंबांतील सर्व माणसें एकाच खोलींत निजतात इतकेंच नव्हे तर कधीकधी गुरेंहि त्याच खोलींत घेतात, त्यामुळे ऊब जास्त येते ! जसजशी थंडी जास्त पडते तसतशी माणसें एकमेकांना अधिकाधिक बिलगून निजतात आणि जास्त बिलगल्याचा परिणाम एखादे वेळीं विपरीत होतो ! अशा स्थितींत एक चौदा वर्षांचें आंतील मुलगी आणि तिचा विधुर बाप एकत्र निजत असत आणि घरांत दुसरें कोणि नव्हतें. झोंपेंत बाप आपली विधुरावस्था विसरला की काय झालें कोणाला ठाऊक, पण कांही महिन्यांनी तिला मूल झालें ! काय करावें हें तिला समजेना, कारण तिला असें पहिल्यांदाच झालें होतें. पण घाण काढून टाकली पाहिजे हें तिला कळत होतें आणि तिने कचऱ्याबरोबर तें मूलहि कचऱ्याच्या पेटींत टाकलें ! या वेळींहि हिंवाळाच असल्यामुळे मूल ताबडतोब गोठून मेलें. तथापि प्रेत सांपडलें आणि तिच्यावर खटला झाला. परंतु ज्युरीने एकमताने तिला निर्दोषी ठरविलें. तेथे सर्वांचेच एकमत झालें की हा सर्व हिंवाळ्याचा दोष होता. हिंवाळ्यांत असें कोणालाहि होईल ! कोर्टांतून सुटल्यावर ती बापाकडे परत गेली. तो घरीं स्वस्थ होता आणि त्याला या बाबतींत कोणीं विचारलेंहि नाही. ( ' इदे लीब्र ' )

---

**पैसे कसे पाठवावे ?** कांही लोक बऱ्याच किंमतीचीं तिकिटें किंवा एखादेवेळीं नोटही पत्रांतून पाठवतात व पत्रे गहाळ झाल्यामुळे फसतात. आम्हास मनीआॅर्डर करण्यास कांही लोक लाजतात, त्यानी हल्ली पोस्टल ऑर्डरची सोय झाली आहे, तिचा फायदा घ्यावा. माहिती कोणत्याही पोस्टांत मिळेल.